महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन



पोलीस आयुक्त, ठाणे यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/सपोनि/प्रशासकीय बदली/ १७६४ /२०२६, दि. ३०/०६/२०२६

संदर्भ :- १) महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१.
२) आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांच्या दि. ३०/०६/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

विषय :- पोलीस अधिकाऱ्यांच्या विनंती बदली / नेमणूकीबाबत.

----००००----

आदेश :-

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२ न (२) मधील सुधारीत स्पष्टीकरणानुसार आयुक्तालय स्तरावरील पोलीस आस्थापना मंडळ यांना अपवादात्मक प्रकरणांमध्ये जनहितार्थ आणि प्रशासनिक निकडीनूसार सक्षम प्राधिकारी म्हणून प्रदान असलेल्या अधिकारान्वये, ठाणे शहर पोलीस आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील खालील नमूद सहायक पोलीस निरीक्षक यांची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात येत आहे.

अ.क्र.	सहायक पोलीस निरीक्षक यांचे नाव	सध्याची नेमणूक ठिकाण	बदली (नेमणूक) ठिकाण
१	अभिषेक अंगद नामपल्ले	ठाणे नगर पो.स्टे. (संलग्न मुख्यालय) बदली आदेशाधीन	पोलीस मुख्यालय, ठाणे

२. संबंधित प्रभारी अधिकारी यांनी या आदेशाची प्रत उक्त नमूद पोलीस अधिकारी यांना बजावून त्यांना तात्काळ बदली ठिकाणी कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करावा. बदली झालेल्या पोलीस अधिकाऱ्यांना कार्यमुक्त करताना पर्यायी/ बदलीवर येणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांची वाट पाहू नये.

३. संबंधित प्रभारी अधिकारी यांनी उक्त नमूद पोलीस अधिकारी यांचा अतिरीक्त कार्यभार तसेच त्यांच्याकडील प्रलंबित असलेली प्रकरणे व तपासावरील प्रलंबित असलेले गुन्हे जमा करुन घेवुन पोलीस ठाणे/ शाखेत सेवेने ज्येष्ठ असलेल्या पोलीस अधिकारी यांच्याकडे देण्याबाबत कार्यवाही करावी.

४. बदली झालेल्या संबंधित पोलीस अधिकारी यांनी त्यांच्या बदली ठिकाणी तात्काळ हजर व्हावे. संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नमूद पोलीस अधिकारी हजर झाल्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयात सादर करावा.

Mmakwana 30/6/26

पोलीस आस्थापना
मंडळाच्या मान्यतेने

(मिना मकवाणा)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १,
पोलीस आयुक्तालय, ठाणे

प्रत :- पोलीस सह आयुक्त, गुन्हे, ठाणे
सर्व अपर पोलीस आयुक्त, ठाणे
सर्व पोलीस उप आयुक्त, ठाणे
सर्व संबंधित सहायक पोलीस आयुक्त, ठाणे
सहायक पोलीस आयुक्त, बिनतारी संदेश विभाग, ठाणे (ई ऑफीस कार्यवाहीसाठी)
समन्वय अधिकारी, ९ ए एस कक्ष, ठाणे (पोलीस पत्रकामध्ये प्रसिध्दीसाठी)
कार्यालय अधिक्षक, लेखा शाखा, ठाणे
स्विय सहायक, पोलीस आयुक्त, ठाणे
प्रमुख लिपीक विभागीय चौकशी शाखा / इमारत शाखा / गोपनीय शाखा ३ / ६